महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

ई-मेल- lnjd-desk१६@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२- २२०२६९१३

---

क्रमांक : सासंवि-२०१५/प्र.क्र.३२/का.१६ दिनांक :२९ जानेवारी, २०२६.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी.

विषय :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था शिर्डी सेवाप्रवेश विनियम, २०२५ च्या मान्यतेबाबत...

संदर्भ: - आपले पत्र क्र.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/२३४२/२०२५, दि.०३.०९.२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था शिर्डी सेवाप्रवेश विनियम, २०२५ ला शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर सेवाप्रवेश विनियमांची मान्य करण्यात आलेल्या प्रारुपाची मराठी व इंग्रजी मूळ प्रत आपणाकडे पाठविण्यात येत आहे. सदर सेवाप्रवेश विनियमांचा अर्थ लावताना प्राधिकृत भाषा म्हणून त्यांचे इंग्रजी रुपांतर ग्राह्य धरण्यात यावे. सदर सेवाप्रवेश विनियम या शासन पत्राच्या दिनांकापासून अंमलात येतील. हे सेवाप्रवेश विनियम श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी च्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) पीडीएफ स्वरुपामध्ये प्रसिद्ध करण्यात यावेत. या सेवाप्रवेश विनियमांची स्वच्छ प्रत कायस्वरुपी न्यासाच्या अभिलेखात ठेवण्यात यावी. या सेवाप्रवेश विनियमात शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय कोणतीही सुधारणा करता येणार नाही.

आपला,

29/1/2026
(सागर ज.बोंद्रे)
उप विधि सल्लागार - नि -उप सचिव

सोबत :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी सेवाप्रवेश विनियम, २०२५ ची इंग्रजी व मराठी प्रत,

प्रत,

निवडनस्ती का.१६.

**शासनाने मान्यता दिलेले 'सेवाप्रवेश विनियम – २०२५' संस्थानसाठी दि.२९ जानेवारी, २०२६ पासून लागू करणेबाबत...**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**सामान्य प्रशासन विभाग**
जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/3386/२०२६
दिनांक – 5 FEB 2026

**वाचा -** १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम – २००४
२) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई दि.०७ ऑगस्ट, २००९
३) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद सिव्हील ॲप्लीकेशन क्र.७६९७/२०२३ मधील दि.१४.०७.२०२३ रोजीचा निर्णय
४) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद सिव्हील ॲप्लीकेशन क्र.८७०७/२०२३ मधील दि.११.०८.२०२३ व दि.०९.११.२०२३ रोजीचा निर्णय
५) मा.तदर्थ समितीची दि.१२.०८.२०२३ रोजी चक्रिय पद्धतीने प्राप्त मान्यता
६) जा.नं.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/१८९२/२०२३ दि.१९ ऑगस्ट, २०२३
७) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-२०१५/५१९/प्र.क्र.३२/का-१६ मंत्रालय, मुंबई दि.३१ ऑगस्ट, २०२३ रोजीचे पत्र
८) जा.नं.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/२११३/२०२३ दि.०८ सप्टेंबर, २०२३
९) जा.नं.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/१७०१/२०२३ दि.३० सप्टेंबर, २०२३ रोजीचे परिपंत्रक
१०) श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे दि.०९.१०.२०२३ रोजीचे पत्र
११) जा.नं.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/१८०५/२०२३ दि.१२ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे परिपत्रक
१२) जा.क्र.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/१८०९/२०२३ दि.१२ ऑक्टोबर, २०२३ रोजीचा आदेश
१३) विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-२०१५/५१९/प्र.क्र.३२/का-१६ मंत्रालय, मुंबई दि.३१ ऑगस्ट, २०२३ रोजीचे पत्र
१४) विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२१ नोव्हेंबर, २०२३ चे पत्र
१५) मा.तदर्थ समितीचे दि.०३.०१.२०२४ चे सभेतील निर्णय क्र.३
१६) जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३५४३/२०२४ दि.०६ जानेवारी, २०२४ रोजीचे पत्र
१७) विधी व न्याय विभाग, शासन पत्र क्र.सासंवि-२०१५/५१८/प्र.क्र.३२/का.१६ दि.२६ ऑगस्ट, २०२४ रोजीचे पत्र
१८) जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२९८४/२०२४ दि.३० नोव्हेंबर, २०२४ चे पत्र (श्री.भागवंत यांची नियुक्ती)
१९) मा.तदर्थ समितीचे सभेत दि.२४ मार्च, २०२५ रोजी चक्रिय पद्धतीने मिळालेली मान्यता
२०) जा.क्र.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/४५८४/२०२५ दि.२६ मार्च, २०२५
२१) विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांचेकडील दि.०२.०५.२०२५ रोजीचे पत्र
२२) जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४८४/२०२५ दि.०३ मे, २०२५ रोजीचे पत्र
२३) मा.तदर्थ समितीचे दि.०२.०९.२०२५ चे सभेतील निर्णय क्र.४३९
२४) जा.क्र.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/२३४२/२०२५ दि.०३ सप्टेंबर, २०२५
२५) विधि व न्याय विभाग, क्रमांक सासंवि-२०१५/प्र.क्र.३२/का-१६ मंत्रालय, मुंबई दि.२९ जानेवारी,, २०२६ रोजीचे पत्र

**प्रस्तावना** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४) याचे कलम १५ चे पोटकलम २ सह उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (झ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे व्यवस्थापन समितीस सेवाप्रवेश विनियम तयार करण्याचे अधिकार आहेत. तथापि सद्यस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) येथे व्यवस्थापन समिती नसून तदर्थ

समिती कार्यरत आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल जनहित याचिका क्रमांक ९८/२०२१ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक ८७०७/२०२३ दि.०९.०५.२०२४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तदर्थ समितीने वाचा क्र.२३ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांचे सेवाप्रवेश विनियम तयार करुन, वाचा क्र.२४ नुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले होते. सदर सेवाप्रवेश विनियम – २०२५ ला उपरोक्त वाचा क्र.२५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

## आदेश

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४) याचे कलम १५ चे पोटकलम २ सह उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (झ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील निर्देशानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे तदर्थ समितीने मान्यतेसाठी सादर केलेल्या 'सेवाप्रवेश विनियम – २०२५' ला महाराष्ट्र शासनाने दि.२९ जानेवारी, २०२६ रोजी मान्यता दिलेली असून, ते संस्थानसाठी **दि.२९ जानेवारी, २०२६** पासून अंमलात येतील.

सेवाप्रवेश विनियमांचा अर्थ लावताना प्राधिकृत भाषा म्हणून त्यांचे इंग्रजी रुपांतर ग्राह्य धरण्यात येईल. संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाने सदरचे सेवाप्रवेश विनियम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या sai.org.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) पीडीएफ स्वरुपामध्ये प्रसिद्ध करावेत. या सेवाप्रवेश विनियमात शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय कोणतीही सुधारणा करता येणार नाही.

सर्व अधिक्षक / विभागप्रमुख यांनी सेवाप्रवेश विनियम २०२५ संस्थानसाठी लागू केलेबाबत सर्व कर्मचा-यांना समज देऊन एका प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेऊन प्रत विभागाचे दप्तरी ठेवावी.

**सदर आदेशाची अंमलबजावणी दि.२९ जानेवारी, २०२६ पासून करण्यात यावी.**

**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**प्रत –**

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
२) सर्व अधिक्षक / विभागप्रमुख
३) स्थळपत